StudentBounty.com

Test Booklet No.
प्रश्नपत्रिका क्र. **D**

# Paper-I

**Signature and Name of Invigilator**

1. (Signature) ........................................
   (Name) ................................................
2. (Signature) ........................................
   (Name) ................................................

Seat No. | | | | | | |
(In figures as in Admit Card)

Seat No. ............................................................
(In words)

OMR Sheet No. | | | | | | |
(To be filled by the Candidate)

## DEC - 00013

**Time Allowed : 1¼ Hours]** **[Maximum Marks : 100**

Number of Pages in this Booklet : **32** Number of Questions in this Booklet : **60**

**Instructions for the Candidates**

1. Write your Seat No. and OMR Sheet No. in the space provided on the top of this page.
2. This paper consists of **sixty (60)** multiple-choice type of questions, out of which the candidate would be required to answer any *fifty* (**50**) questions. In the event of the candidate attempting more than fifty questions, the first fifty questions attempted by the candidate would be evaluated.
3. At the commencement of examination, the question booklet will be given to the student. In the first 5 minutes, you are requested to open the booklet and compulsorily examine it as follows :
   (*i*) To have access to the Question Booklet, tear off the paper seal on the edge of this cover page. Do not accept a booklet without sticker-seal or open booklet.
   (*ii*) **Tally the number of pages and number of questions in the booklet with the information printed on the cover page. Faulty booklets due to missing pages/ questions or questions repeated or not in serial order or any other discrepancy should not be accepted and correct booklet should be obtained from the invigilator within the period of 5 minutes. Afterwards, neither the Question Booklet will be replaced nor any extra time will be given. The same may please be noted.**
   (*iii*) After this verification is over, the OMR Sheet Number should be entered on this Test Booklet.
4. Each question has four alternative responses marked (A), (B), (C) and (D). You have to darken the circle as indicated below on the correct response against each item.
   **Example :** where (C) is the correct response.
   (A) (B) ● (D)
5. Your responses to the items are to be indicated in the **OMR Sheet given inside the Booklet only.** If you mark at any place other than in the circle in the OMR Sheet, it will not be evaluated.
6. Read instructions given inside carefully.
7. Rough Work is to be done at the end of this booklet.
8. If you write your Name, Seat Number, Phone Number or put any mark on any part of the OMR Sheet, except for the space allotted for the relevant entries, which may disclose your identity, or use abusive language or employ any other unfair means, you will render yourself liable to disqualification.
9. You have to return original OMR Sheet to the invigilator at the end of the examination compulsorily and must not carry it with you outside the Examination Hall. You are, however, allowed to carry the Test Booklet and duplicate copy of OMR Sheet on conclusion of examination.
10. **Use only Blue/Black Ball point pen.**
11. **Use of any calculator or log table, etc., is prohibited.**
12. **There is no negative marking for incorrect answers.**

**विद्यार्थ्यांसाठी महत्त्वाच्या सूचना**

1. परिक्षार्थींनी आपला आसन क्रमांक या पृष्ठावरील वरच्या कोपऱ्यात लिहावा. तसेच आपणांस दिलेल्या उत्तरपत्रिकेचा क्रमांक त्याखाली लिहावा.
2. या प्रश्नपत्रिकेत **साठ** बहुनिवड प्रश्न आहेत, यापैकी परीक्षार्थ्यांना कोणतेही **पन्नास** प्रश्न सोडवायचे आहेत. जर परीक्षार्थ्याने पन्नासपेक्षा जास्त प्रश्न सोडविले तर त्यावेळेस त्याने सोडविलेले पहिले पन्नास प्रश्नच तपासले जाईल.
3. परीक्षा सुरू झाल्यावर विद्यार्थ्याला प्रश्नपत्रिका दिली जाईल. सुरुवातीच्या 5 मिनीटांमध्ये आपण सदर प्रश्नपत्रिका उघडून खालील बाबी अवश्य तपासून पहाव्यात.
   (*i*) प्रश्नपत्रिका उघडण्यासाठी प्रश्नपत्रिकेवर लावलेले सील उघडावे. सील नसलेली किंवा सील उघडलेली प्रश्नपत्रिका स्विकारू नये.
   (*ii*) **पहिल्या पृष्ठावर नमूद केल्याप्रमाणे प्रश्नपत्रिकेची एकूण पृष्ठे तसेच प्रश्नपत्रिकेतील एकूण प्रश्नांची संख्या पडताळून पहावी. पृष्ठे कमी असलेली/कमी प्रश्न असलेली/प्रश्नांचा चूकीचा क्रम असलेली किंवा इतर त्रुटी असलेली सदोष प्रश्नपत्रिका सुरुवातीच्या 5 मिनिटातच पर्यवेक्षकाला परत देऊन दुसरी प्रश्नपत्रिका मागवून घ्यावी. त्यानंतर प्रश्नपत्रिका बदलून मिळणार नाही तसेच वेळही वाढवून मिळणार नाही याची कृपया विद्यार्थ्यांनी नोंद घ्यावी.**
   (*iii*) वरीलप्रमाणे सर्व पडताळून पहिल्यानंतरच प्रश्नपत्रिकेवर ओ.एम.आर. उत्तरपत्रिकेचा नंबर लिहावा.
4. प्रत्येक प्रश्नासाठी (A), (B), (C) आणि (D) अशी चार विकल्प उत्तरे दिली आहेत. त्यातील योग्य उत्तराचा रकाना खाली दर्शविल्याप्रमाणे ठळकपणे काळा/निळा करावा.
   **उदा. :** जर (C) हे योग्य उत्तर असेल तर.
   (A) (B) ● (D)
5. या प्रश्नपत्रिकेतील प्रश्नांची उत्तरे **ओ.एम.आर. उत्तरपत्रिकेतच दर्शवावीत.** इतर ठिकाणी लिहिलेली उत्तरे तपासली जाणार नाहीत.
6. आत दिलेल्या सूचना काळजीपूर्वक वाचाव्यात.
7. प्रश्नपत्रिकेच्या शेवटी जोडलेल्या कोऱ्या पानावरच कच्चे काम करावे.
8. जर आपण ओ.एम.आर. वर नमूद केलेल्या ठिकाणा व्यतिरीक्त इतर कोठेही नाव, आसन क्रमांक, फोन नंबर किंवा ओळख पटेल अशी कोणतीही खूण केलेली आढळून आल्यास अथवा असभ्य भाषेचा वापर किंवा इतर गैरमार्गांचा अवलंब केल्यास विद्यार्थ्याला परीक्षेस अपात्र ठरविण्यात येईल.
9. परीक्षा संपल्यानंतर विद्यार्थ्याने मूळ ओ.एम.आर. उत्तरपत्रिका पर्यवेक्षकांकडे परत करणे आवश्यक आहे. तथापी, प्रश्नपत्रिका व ओ.एम.आर. उत्तरपत्रिकेची द्वितीय प्रत आपल्याबरोबर नेण्यास विद्यार्थ्यांना परवानगी आहे.
10. **फक्त निळ्या किंवा काळ्या बॉल पेनचाच वापर करावा.**
11. **कॅलक्युलेटर किंवा लॉग टेबल वापरण्यास परवानगी नाही.**
12. **चुकीच्या उत्तरासाठी गुण कपात केली जाणार नाही.**

www.StudentBounty.com

www.StudentBounty.com

StudentBounty.com



# Paper I
# प्रश्नपत्रिका I

**Time Allowed : 75 Minutes]** **[Maximum Marks : 100**

**Note :** (1) This Paper contains **Sixty (60)** multiple choice questions, each question carrying **Two (2)** marks.

(2) Attempt any **Fifty** (**50**) questions.

**सूचना :** (1) या प्रश्नपत्रिकेत **साठ (60)** बहुनिवड प्रश्न दिलेले असून प्रत्येक प्रश्नाला **दोन (2)** गुण आहेत.

(2) कोणत्याही **पन्नास** (**50**) प्रश्नांची उत्तरे लिहा.

1. Suresh and Vidya are cousins. Madhuri is the sister of Vidya. Ganesh is the father of Suresh. How is Madhuri related to Ganesh ?

(A) Daughter

(B) Niece

(C) Cousin

(D) Uncle

2. In a code language, the word BAD is written as 658. In the same language, what could be the code for FIG ?

(A) 9 12 10

(B) 10 13 11

(C) 8 11 13

(D) 10 12 13

3. Which of the following pairs is different from others ?

(A) Brother—Sister

(B) Tall—Short

(C) Black—White

(D) Old—Young

1. सुरेश आणि विद्या ही चुलतभावंडे आहेत. माधुरी ही विद्याची बहीण आहे. गणेश हे सुरेशचे वडील आहेत. तर माधुरीचे गणेशशी काय नाते आहे ?

(A) कन्या

(B) पुतणी

(C) चुलतबहिण

(D) चुलते

2. एका सांकेतिक भाषेत BAD हा शब्द 658 असा लिहितात. तर त्याच भाषेत FIG या शब्दाचा सांकेतांक काय असेल ?

(A) 9 12 10

(B) 10 13 11

(C) 8 11 13

(D) 10 12 13

3. पुढीलपैकी कोणती शब्दजोडी इतरांपेक्षा वेगळी आहेत ते सांगा :

(A) भाऊ—बहिण

(B) उंच—खुजा

(C) काळा—पांढरा

(D) वृद्ध—तरुण



www.StudentBounty.com

StudentBounty.com



4. Find the odd-one from the following :
   (A) DFEG
   (B) JLKM
   (C) GHIK
   (D) RTSU

5. There are three statements I, II and III. Based on these statements, which of the conclusions is *correct* ?

   **Statements :**

   I. Mahesh is taller than Arun.

   II. Ganesh is shorter than Arun.

   III. Seema is taller than Ganesh.

   **Conclusions :**

   (A) Arun is the tallest of all.
   (B) Ganesh is shorter than Seema.
   (C) Seema is taller than Mahesh.
   (D) Mahesh is taller than Seema.

6. Assuming that the following statements I and II are true, which of the following conclusions could be *true* ?

   **Statements :**

   I. All teachers are managers.

   II. Some teachers are females.

   **Conclusions :**

   1. Some teachers are managers.
   2. No manager is a female.

   (A) Only conclusion 1 follows.
   (B) Only conclusion 2 follows.
   (C) Both conclusions 1 and 2 follow.
   (D) Both conclusion 1 and conclusion 2 not follow.

4. पुढीलपैकी कोणता पर्याय इतरांपेक्षा वेगळा आहे ते लिहा :
   (A) DFEG
   (B) JLKM
   (C) GHIK
   (D) RTSU

5. पुढे I, II व III अशी विधाने दिली आहेत. त्यावर आधारित पुढीलपैकी कोणते निष्कर्ष बरोबर आहेत ते लिहा.

   **विधाने :**

   I. महेश हा अरुणपेक्षा उंच आहे.

   II. गणेश अरुणपेक्षा उंचीने कमी आहे.

   III. सीमा गणेशपेक्षा उंच आहे.

   **निष्कर्ष :**

   (A) अरुण हा सर्वात उंच आहे.
   (B) गणेश हा सीमापेक्षा उंचीने कमी आहे.
   (C) सीमा ही महेशपेक्षा उंच आहे.
   (D) महेश हा सीमापेक्षा उंच आहे.

6. पुढील विधाने I व II सत्य आहेत असे गृहीत धरल्यास, पुढीलपैकी कोणते निष्कर्ष बरोबर आहेत ते सांगा.

   **विधाने :**

   I. सर्व शिक्षक व्यवस्थापक आहेत.

   II. काही शिक्षक स्त्रिया आहेत.

   **निष्कर्ष :**

   1. काही शिक्षक व्यवस्थापक आहेत.
   2. एकही व्यवस्थापक स्त्री नाही.

   (A) फक्त निष्कर्ष 1 बरोबर आहे.
   (B) फक्त निष्कर्ष 2 बरोबर आहे.
   (C) निष्कर्ष 1 व 2 दोन्ही बरोबर आहेत.
   (D) निष्कर्ष 1 आणि निष्कर्ष 2 दोन्ही बरोबर नाहीत.



www.StudentBounty.com

StudentBounty.com



**Read the following table and answer the questions 7 and 8 :**

| Details of Expenditure | Percentage |
|---|---|
| Expenses on food | 30 |
| House rent | 25 |
| Education | 12 |
| Clothing | 18 |
| Sundry | 15 |

7. A family earning Rs. 35,000 per month went on a holiday for two weeks. How much could they have saved on food if they had stayed with relatives during the holidays ?
   (A) Rs. 1,750
   (B) Rs. 5,250
   (C) Rs. 1,050
   (D) Rs. 1,030

8. A newly married couple earns Rs. 35,000 per month. If they spend as per the table, how much can they save in two years ?
   (A) Rs. 20,000
   (B) Rs. 1,00,000
   (C) Rs. 1,00,800
   (D) Nil

**पुढील तक्ता वाचून प्रश्न क्र. 7 व 8 चे उत्तरे लिहा :**

| खर्चाचा तपशील | टक्केवारी |
|---|---|
| खाण्यापिण्याचा खर्च | 30 |
| घरभाडे | 25 |
| शिक्षण | 12 |
| कपडे | 18 |
| इतर (किरकोळ) | 15 |

7. मासिक उत्पन्न 35,000 रु. असणारे एक कुटुंब दोन आठवड्यांच्या सुटीवर गेले. सुटीच्या काळात जर त्यांनी आपल्या नातेवाईकांकडे वास्तव्य केले असते, तर त्यांच्या खाण्यापिण्याच्या खर्चात किती बचत झाली असती ?
   (A) 1,750 रु.
   (B) 5,250 रु.
   (C) 1,050 रु.
   (D) 1,030 रु.

8. एका नवविवाहित दाम्पत्याचे मासिक उत्पन्न 35,000 रु. इतके आहे. जर त्यांनी तक्त्यात दाखवल्या प्रमाणे खर्च केला, तर दोन वर्षांत ते किती बचत करू शकतील ?
   (A) 20,000 रु.
   (B) 1,00,000 रु.
   (C) 1,00,800 रु.
   (D) काहीही नाही



www.StudentBounty.com

StudentBounty.com



**Attempt questions 9 and 10 using the data given in the following table :**

The following table shows the number of breakdown calls received by six different breakdown service centres of a bus operator in a city for a period of six months April-September.

| Service Centre | April | May | June | July | August | September |
|---|---|---|---|---|---|---|
| U | 67 | 79 | 48 | 70 | 78 | 88 |
| V | 68 | 75 | 87 | 62 | 84 | 74 |
| W | 71 | 55 | 58 | 78 | 59 | 69 |
| X | 83 | 64 | 56 | 52 | 63 | 52 |
| Y | 61 | 58 | 65 | 66 | 65 | 75 |
| Z | 75 | 49 | 76 | 72 | 56 | 42 |

9. The service centre that received the minimum number of calls during the six months is :

(A) V

(B) X

(C) Z

(D) U

**पुढील तक्त्यामधील माहितीवरून प्रश्न क्र. 9 आणि 10 सोडवा :**

एका शहरातील बस वाहतुकदाराच्या तांत्रिक बिघाड सेवा केंद्रास एप्रिल ते सप्टेंबर या सहा महिन्यांमध्ये आलेल्या संदेशांची संख्या पुढील तक्त्यामध्ये दिली आहे.

| सर्व्हिस सेंटर | एप्रिल | मे | जून | जुलै | ऑगस्ट | सप्टेंबर |
|---|---|---|---|---|---|---|
| U | 67 | 79 | 48 | 70 | 78 | 88 |
| V | 68 | 75 | 87 | 62 | 84 | 74 |
| W | 71 | 55 | 58 | 78 | 59 | 69 |
| X | 83 | 64 | 56 | 52 | 63 | 52 |
| Y | 61 | 58 | 65 | 66 | 65 | 75 |
| Z | 75 | 49 | 76 | 72 | 56 | 42 |

9. सहा महिन्यांत एकूण संदेशांची संख्या ........................... सर्व्हिस सेंटरसाठी सर्वात कमी आहे.

(A) V

(B) X

(C) Z

(D) U



www.StudentBounty.com

StudentBounty.com



10. The difference between the maximum number and the minimum number of monthly calls is the largest for service centre :

    (A) V

    (B) U

    (C) Z

    (D) X

11. Quantitative data are best compared in the form of a :

    (A) table

    (B) histogram

    (C) dot plot

    (D) pie chart

12. The proportions of related items are best shown by a :

    (A) line graph

    (B) pie chart

    (C) dot plot

    (D) histogram

10. मासिक संदेशांची कमाल संख्या आणि किमान संख्या यांमधील फरक ........................ या सर्व्हिस सेंटरसाठी सर्वात जास्त आहे.

    (A) V

    (B) U

    (C) Z

    (D) X

11. परिमाणात्मक माहितीची सर्वोत्तम तुलना .............................. याद्वारे होते.

    (A) कोष्टक

    (B) आयतचित्र

    (C) बिन्दु आलेख

    (D) वृत्ताकार तक्ता

12. .................................. चा सर्वोत्तम वापर संबंधित बाबींचे प्रमाण दर्शविण्यासाठी केला जातो.

    (A) रेखा आलेख

    (B) वृत्ताकार तक्ता

    (C) बिन्दू आलेख

    (D) आयत चित्र



www.StudentBounty.com

StudentBounty.com



13. Identify the pair that appears in the reverse chronological order of development :

    (A) Mainframe and Desktop

    (B) Desktop and Laptop

    (C) Tablet and Laptop

    (D) Laptop and Tablet

14. Arrange the following units of computer memory in descending order of magnitude :

    byte, gigabyte, bit, megabyte, terrabyte

    (A) terrabyte, gigabyte, megabyte, byte, bit

    (B) gigabyte, terrabyte, megabyte, bit, byte

    (C) gigabyte, megabyte, terrabyte, byte, bit

    (D) terrabyte, megabyte, gigabyte, bit, byte

13. पुढील जोड्यांपैकी कालानुक्रमाच्या विरुद्ध असलेली जोडी ओळखा :

    (A) मेनफ्रेम व डेस्कटॉप

    (B) डेस्कटॉप व लॅपटॉप

    (C) टॅब्लेट व लॅपटॉप

    (D) लॅपटॉप व टॅब्लेट

14. पुढे दिलेली संगणकाच्या स्मृतीमापनाची एकके उतरत्या क्रमानुसार मांडा :

    बाईट, गिगाबाईट, बिट, मेगाबाईट, टेराबाईट

    (A) टेराबाईट, गिगाबाईट, मेगाबाईट, बाईट, बिट

    (B) गिगाबाईट, टेराबाईट, मेगाबाईट, बिट, बाईट

    (C) गिगाबाईट, मेगाबाईट, टेराबाईट, बाईट, बिट

    (D) टेराबाईट, मेगाबाईट, गिगाबाईट, बिट, बाईट



www.StudentBounty.com

StudentBounty.com



15. Identify the matching pairs :

    (*i*) JPEG — Photo/Picture

    (*ii*) MP3 — Audio/Video

    (*iii*) XLS — PowerPoint Presentation

    (*iv*) AVI — Statistical Information

    (A) (*i*) and (*ii*)

    (B) (*ii*) and (*iii*)

    (C) (*iii*) and (*iv*)

    (D) (*i*) and (*iv*)

16. In the context of Internet, UGC stands for :

    (A) University Grants Commission

    (B) Universal Graphic Communication

    (C) User Group Configuration

    (D) User Generated Content

17. Which of the following softwares is used for processing photos or pictures ?

    (A) Photocrop

    (B) Photoshop

    (C) Visucrop

    (D) Picture Perfect

15. पुढीलपैकी योग्य जोड्या ओळखा :

    (*i*) JPEG — चित्रे/छायाचित्रे

    (*ii*) MP3 — ध्वनी/दृक्-श्राव्य

    (*iii*) XLS — पॉवरपॉईंट सादरीकरण

    (*iv*) AVI — सांख्यिकी माहिती

    (A) (*i*) आणि (*ii*)

    (B) (*ii*) आणि (*iii*)

    (C) (*iii*) आणि (*iv*)

    (D) (*i*) आणि (*iv*)

16. इंटरनेटच्या संदर्भात "यू जी सी" चे विस्ताररूप काय आहे ?

    (A) युनिव्हर्सिटी ग्रँट्स् कमिशन

    (B) युनिव्हर्सल ग्राफिक कम्युनिकेशन

    (C) युजर ग्रुप कॉन्फिगरेशन

    (D) युजर जनरेटेड कन्टेन्ट

17. फोटो किंवा चित्रांवर प्रक्रिया करण्यासाठी पुढीलपैकी कोणते सॉफ्टवेअर वापरले जाते ?

    (A) फोटोक्रॉप

    (B) फोटोशॉप

    (C) व्हिज्यूक्रॉप

    (D) पिक्चर परफेक्ट



www.StudentBounty.com

StudentBounty.com



18. In the context of Internet, identify the incorrect pair from the following :

    (A) .gov — government website

    (B) .com — commercial website

    (C) .ac — accounting website

    (D) .edu — educational website

19. Which one of the following regions of India is known as "biodiversity hot-spot" ?

    (A) Eastern Ghats

    (B) Thar desert

    (C) Deccan plateau

    (D) Western Ghats

20. The air pollutant known as "secondary" in nature is :

    (A) Sulphur dioxide

    (B) Ammonia

    (C) Peroxyacetyl nitrate

    (D) Methane

18. इंटरनेटच्या संदर्भात, पुढीलपैकी चुकीची जोडी ओळखा :

    (A) .gov — सरकारी संकेतस्थळ

    (B) .com — व्यापारी संकेतस्थळ

    (C) .ac — हिशोबाचे संकेतस्थळ

    (D) .edu — शैक्षणिक संकेतस्थळ

19. भारतातील पुढीलपैकी कोणता प्रदेश जीववैविध्याच्या दृष्टीने "अतिमहत्त्वाचा" म्हणून ओळखला गेला आहे ?

    (A) पूर्व घाटी

    (B) थरचे वाळवंट

    (C) दक्खनचे पठार

    (D) पश्चिम घाटी

20. स्वाभाविकपणे "दुय्यम" असलेला वायूप्रदूषक कोणता ?

    (A) सल्फर डायॉक्साईड

    (B) अमोनिया

    (C) पेरॉक्सिअॅसेटिल नायट्रेट

    (D) मेथेन



www.StudentBounty.com

StudentBounty.com



21. In hilly areas, landslides occur due to :
    - (A) deforestation
    - (B) aforestation
    - (C) winds
    - (D) grazing

22. Fly ash is produced in a factory during :
    - (A) manufacturing chemical fertilizers
    - (B) refining of bauxite
    - (C) smelting steel
    - (D) production of thermal power

23. Kyoto protocol aims at :
    - (A) containing emissions of green-house gases
    - (B) stabilizing ozone cover
    - (C) reducing water pollution
    - (D) arresting desertification

21. डोंगराळ प्रदेशात भूस्खलन होण्याचे कारण म्हणजे :
    - (A) वनसंहार
    - (B) वनीकरण
    - (C) वारा
    - (D) चरणे

22. कारखान्यातील कोणत्या कार्यप्रक्रियेत राख तयार होते ?
    - (A) रासायनिक खतांची निर्मिती
    - (B) बॉक्साईटचे शुद्धीकरण
    - (C) पोलादाचा रस गाळणे
    - (D) औष्णिक वीज निर्मिती

23. क्योटो मसुद्याचा उद्देश कोणता ?
    - (A) पृथ्वी गरम करणारे वायू कमी प्रमाणात हवेत सोडणे
    - (B) ओझोन छत्रीचे स्थिरीकरण करणे
    - (C) जलप्रदूषण कमी करणे
    - (D) वाळवंटीकरण थांबवणे



www.StudentBounty.com

StudentBounty.com



24. A major cause of water-borne diseases in India is :
    (A) hardness of water
    (B) scarcity of water
    (C) pollution of water
    (D) saline water

25. Which of the following is a degree-awarding body ?
    (A) Council of Scientific and Industrial Research
    (B) University Grants Commission
    (C) Gokhale Institute of Politics and Economics
    (D) Indian Council of Historical Research

26. In the Constitution of India, the power to legislate on education is a part of :
    (A) Union list
    (B) State list
    (C) Concurrent list
    (D) Seventh schedule

24. भारतात पाण्यामुळे होणाऱ्या आजारांचे प्रमुख कारण म्हणजे :
    (A) पाण्याचा कठिणपणा
    (B) पाण्याचे दुर्भिक्ष
    (C) प्रदूषित पाणी
    (D) खारे पाणी

25. पुढीलपैकी कोणती संस्था पदवी प्रदान करते ?
    (A) वैज्ञानिक तथा औद्योगिक अनुसंधान परिषद
    (B) विश्वविद्यालय अनुदान आयोग
    (C) गोखले राज्यशास्त्र व अर्थशास्त्र संस्था
    (D) भारतीय इतिहास अनुसंधान परिषद

26. भारतीय राज्यघटनेने शिक्षण हा विषय .......................... मध्ये अंतर्भूत केलेला आहे.
    (A) संघसूची
    (B) राज्यसूची
    (C) सामायिक सूची
    (D) सातवे परिशिष्ट



www.StudentBounty.com

StudentBounty.com



27. Full form of B.C.U.D. is :

(A) Bureau of College and University Development

(B) Board of Councillors for University Development

(C) Board of College and University Directors

(D) Board of College and University Development

28. In state universities of Maharashtra, a Board of Studies is formed by :

(A) elected heads of departments only

(B) elected heads of departments and nominated experts

(C) elected heads of departments and nominated teachers

(D) elected heads of departments, co-opted teachers and co-opted experts

27. बी.सी.यू.डी. चे पूर्ण रूप कोणते ?

(A) ब्यूरो ऑफ कॉलेज अँड युनिव्हर्सिटी डेव्हलपमेंट

(B) बोर्ड ऑफ कौन्सिलर्स फॉर युनिव्हर्सिटी डेव्हलपमेंट

(C) बोर्ड ऑफ कॉलेज अँड युनिव्हर्सिटी डायरेक्टर्स

(D) बोर्ड ऑफ कॉलेज अँड युनिव्हर्सिटी डेव्हलपमेंट

28. महाराष्ट्रातील राज्य विद्यापीठांत अभ्यासमंडळ ............................ यांचे बनते.

(A) फक्त निर्वाचित विभागप्रमुख

(B) निर्वाचित विभागप्रमुख आणि पदनिर्देशित तज्ञ

(C) निर्वाचित विभागप्रमुख आणि पदनिर्देशित शिक्षक

(D) निर्वाचित विभागप्रमुख, स्वीकृत शिक्षक आणि स्वीकृत तज्ञ



www.StudentBounty.com

StudentBounty.com



29. Long form of AICTE is :

(A) All India Council for Technical Education

(B) All India Commission for Technology Education

(C) All India Committee for Teachers' Education

(D) All India Congress for Trainee Education

30. Which of the following is an extension activity of a state university ?

(A) Continuing and Distance Education

(B) Bridge Courses

(C) Remedial Teaching

(D) Earn and Learn Scheme

29. ए.आय.सी.टी.ई. चे पूर्ण रूप काय आहे ?

(A) ऑल इंडिया कौन्सिल फॉर टेक्निकल एज्युकेशन

(B) ऑल इंडिया कमिशन फॉर टेक्नॉलॉजी एज्युकेशन

(C) ऑल इंडिया कमिटी फॉर टीचर्स एज्युकेशन

(D) ऑल इंडिया कॉंग्रेस फॉर ट्रेनी एज्युकेशन

30. पुढीलपैकी कोणता उपक्रम हा राज्य विद्यापीठाच्या विस्तार-कार्याचा भाग आहे ?

(A) निरंतर आणि दूर शिक्षण

(B) जोड अभ्यासक्रम राबवणे

(C) उपचारात्मक अध्यापन

(D) कमवा आणि शिका योजना



www.StudentBounty.com

StudentBounty.com



31. Openbook tests are recommended mainly because :

    (A) they reduce malpractice in examinations

    (B) students need not spend time in studying for examination

    (C) they reduce emphasis on rote memory

    (D) students are relaxed at the time of examination

32. What is the best use of internet in teaching ?

    (A) For presenting content through audio-visual media

    (B) For providing latest information

    (C) For saving time and energy of a teacher

    (D) For making learning inter-active

31. पुस्तक वापरून उत्तरे लिहिण्याच्या चाचण्यांची शिफारस करण्याचे प्रमुख कारण म्हणजे :

    (A) त्यांच्यामुळे परीक्षांमधील गैरव्यवहार कमी होतात

    (B) विद्यार्थ्यांना परीक्षेच्या तयारीसाठी वेळ घालवावा लागत नाही

    (C) त्यांच्यामुळे यांत्रिक स्मरणावरील भर कमी होतो

    (D) परीक्षेच्या वेळी विद्यार्थी निश्चिंत असतात

32. अध्यापनात अंतरजालाचा सर्वोत्तम उपयोग कोणता ?

    (A) दृक-श्राव्य माध्यमातून आशय सादर करण्यासाठी

    (B) अत्याधुनिक माहिती पुरविण्यासाठी

    (C) शिक्षकाचा वेळ व श्रम वाचविण्यासाठी

    (D) अध्ययन आंतरक्रियात्मक करण्यासाठी



www.StudentBounty.com

StudentBounty.com



33. The most recently accepted paradigm of learning is that a learner is a :

(A) constructor of knowledge

(B) receiver of knowledge

(C) consumer of knowledge

(D) collector of knowledge

34. The main purpose of including practical work in curriculum is :

(A) reducing over-emphasis on theory

(B) developing various skills in students

(C) helping students score better in examination

(D) keeping students engaged throughout the year

33. अध्ययनाबाबतची सर्वात अलिकडे स्वीकारलेली विचारधारा म्हणजे अध्ययनकर्ता हा :

(A) ज्ञानाचा रचयिता आहे

(B) ज्ञानाचा स्वीकारक आहे

(C) ज्ञानाचा उपभोक्ता आहे

(D) ज्ञानाचा संकलक आहे

34. अभ्यासक्रमात प्रात्यक्षिक कार्य समाविष्ट करण्याचा प्रमुख हेतू म्हणजे :

(A) सैद्धान्तिक भागावरील अतिरिक्त भर कमी करणे

(B) विद्यार्थ्यांच्या विविध कौशल्यांचा विकास करणे

(C) विद्यार्थ्यांना परीक्षेत अधिक गुण मिळवण्यात मदत करणे

(D) विद्यार्थ्यांना वर्षभर गुंतवून ठेवणे



www.StudentBounty.com

StudentBounty.com



35. The best way to understand content is to :

(A) read the content repeatedly

(B) read the content aloud and then silently

(C) write down the content from memory

(D) prepare an appropriate summary of the content

36. Which of the following is *not* an example of intrinsic motivation ?

(A) Vishal is interested in Chemistry

(B) Suneeta is curious to know about innovations in her subject

(C) Ravi completes projects to become eligible to appear for examination

(D) Tripta opts for communication as she wants to enter into marketing business

35. आशय आकलनाचा सर्वोत्तम मार्ग म्हणजे :

(A) आशय पुन:पुन्हा वाचणे

(B) आशयाचे प्रकट व नंतर मौन वाचन

(C) स्मरणातून आशय लिहून काढणे

(D) आशयाचा यथायोग्य सारांश तयार करणे

36. खालीलपैकी कोणते उदाहरण आंतरिक प्रेरणेचे **नाही** ?

(A) विशालला रसायनशास्त्रात अभिरुची आहे

(B) सुनीताला तिच्या विषयातील नवोपक्रम जाणून घेण्याची उत्सुकता आहे

(C) परीक्षेला बसण्यास पात्र व्हावे यासाठी रवी प्रकल्प पूर्ण करतो

(D) विक्रीच्या व्यवसायात प्रवेश करण्याची इच्छा असल्यामुळे तृप्ता संप्रेषण विषयाची निवड करते



www.StudentBounty.com

StudentBounty.com



37. Sampling in qualitative research is similar to ................................ sampling in quantitative research.

(A) simple random

(B) systematic

(C) quota

(D) purposive

38. Close ended questions are those that :

(A) relate to basic demographic characteristics

(B) encourage elaborate response

(C) allows respondents not to answer

(D) have a fixed range of possible answers

39. Cross-cultural studies are an example of :

(A) case study

(B) comparative study

(C) experimental study

(D) cross-sectional study

37. गुणात्मक संशोधनातील नमुना निवड ही संख्यात्मक संशोधनातील नमुना निवडीच्या ........................ या प्रकारासारखी असते.

(A) साधी यादृच्छिक नमुना निवड

(B) पद्धतशीर नमुना निवड

(C) निर्दिष्टांश नमुना निवड

(D) सहेतुक नमुना निवड

38. पर्यायबद्ध प्रश्न हे :

(A) मूळभूत लोकसंख्याशास्त्रीय गुणधर्माशी संबंधित असतात

(B) दीर्घ प्रतिवादाला प्रोत्साहन देतात

(C) कुठल्याही उत्तराची शक्यता नाकारतात

(D) संभाव्य उत्तरांची विशिष्ट व्याप्ती असणारे असतात

39. आंतरसांस्कृतिक अभ्यास हे ..................... चे उदाहरण आहे.

(A) व्यष्टि अभ्यास

(B) तौलनिक अभ्यास

(C) प्रायोगिक अभ्यास

(D) तिर्यक छेदात्मक अभ्यास



www.StudentBounty.com

StudentBounty.com



40. What is a research design ?
    (A) A way of conducting research that is not grounded in theory
    (B) The choice between using qualitative and quantitative methods
    (C) The study in which you present research findings
    (D) A framework for every stage of collection and analysis of data

41. ................................ hypothesis is a proposal based on specific observations.
    (A) Directional
    (B) Null
    (C) Deductive
    (D) Inductive

42. Which one of the following is the most important component of normative research ?
    (A) survey
    (B) participatory observation
    (C) deductive method
    (D) field work

40. संशोधन आराखडा म्हणजे ?
    (A) सैद्धांतिक आधार नसलेले संशोधन करण्याचा मार्ग
    (B) गुणात्मक व संख्यात्मक पद्धतींपैकी एका पद्धतीची निवड
    (C) संशोधन फलिताचे सादरीकरण करण्याची पद्धत
    (D) संकलन व विश्लेषण यासाठी तयार केलेली चौकट माहिती

41. .......................... परिकल्पना ही विशिष्ट निरीक्षणांवर आधारित योजना असते.
    (A) दिशादर्शक
    (B) निराकरणीय
    (C) अनुमानात्मक
    (D) प्रवर्तनात्मक

42. मूल्यात्मक संशोधनाचा सर्वात महत्त्वाचा घटक कोणता ?
    (A) सर्वेक्षण
    (B) सहभागात्मक निरीक्षण
    (C) निगमनात्मक पद्धत
    (D) क्षेत्र कार्य



www.StudentBounty.com

StudentBounty.com



**Answer question Nos. 43 to 48 based on either the English passage or the Marathi passage :**

In the lack of good knowledge of grammar, it is impossible for one to write correctly and effectively. It must be borne in mind that all well-informed and knowledgeable persons judge a man's mind by his writing or speaking. Indeed, to acquire the knowledge of grammar is not an easy task. The grammar is not like arithmetic — a science consisting of several distinct departments, some of which may be dispensed with; it is a whole and the whole must be learnt, or no part is learnt. Its learning demands much reflection and

**प्रश्न क्र. 43 ते 48 हे पुढे दिलेल्या उताऱ्यावर आधारित आहेत. इंग्रजीतील किंवा मराठीतील उताऱ्यावरील प्रश्नांची उत्तरे द्या :**

वाङ्मयाची वर्गवारी केवळ त्याच्या अभ्यासासाठी होत असते. जगातील कोणत्याही कलावंताच्या अनुभवाची कलात्म अभिव्यक्ती हे साहित्य असते आणि तेच खरे साहित्य असते. त्या व्यतिरिक्त प्रसिद्ध झालेले शब्द ललितसाहित्य या संज्ञेस पात्र ठरत नसते. मानवी समाज विकसित होणारा समाज आहे. त्याच्या विकासाच्या प्रत्येक अवस्थेने त्यात राहणाऱ्या माणसाला समाज आणि व्यक्तिकडे, निसर्ग आणि इतिहासाकडे बघण्याची एक दृष्टी दिलेली असते. एकाच समाजातील भिन्न-भिन्न व्यक्तींचे व्यक्तिमत्त्व एक सारखे नसते. कारण नैसर्गिक संचितात आपले स्वत:चे अर्जित गुण आणि जीवनदृष्टी मिसळवताना एकसंध व्यक्तिमत्त्वाला विविध आकार प्राप्त होतात. ही विविधताच प्राणी आणि माणूस यातील व्यवच्छेदक रेषा आहे. त्यामुळे कोणत्याही व्यक्तीने



www.StudentBounty.com

StudentBounty.com



much patience, but when one task is performed it is performed for life, and in everyday of that life it will be found to be, in a greater or less degree, a source of pleasure or profit, or both together. The learning of grammar needs no bodily exertion; it exposes the student to no cold, no hunger, no suffering of any sort. What more, the study does not affect the hours of business, nor the hours of necessary exercise, but the hours usually spent on the tea and coffee shops and in the mere gossip which accompanies them. The wasted hours of only one year, employed in the study of English grammar, would make you a correct speaker

कोणत्याही काळात आपल्याला लाभलेल्या आणि कमावलेल्या जीवनदृष्टीतून आपले अनुभव अभिव्यक्त केले तर ते साहित्यच असते. त्याला आपण प्राचीन, मध्ययुगीन, अर्वाचीन असे कालखंडात, किंवा पाश्चिमात्य, पौर्वात्य असे राष्ट्रांत, ग्रामीण, शहरी असे प्रदेशांत किंवा उच्चवर्गीय, सर्वहारा अशा वर्गांत विभागत असतो. या विभागणीत काल, प्रदेश, वर्ग इ. भेद असले तरी त्याकडे साहित्य म्हणून पाहण्यात भेद ठेवता येत नसतात. त्याची समीक्षा कोणत्याही वर्गवारीच्या अनुषंगाने केली तरी तिचा गाभा वाङ्मयीन आणि कला म्हणूनच असावा लागतो. ललित वाङ्मय ही मूलतः कला आहे आणि कलेचे त्रिकालाबाधीत शास्त्र असू शकत नाही. ज्यांनी कलेला अपरिवर्तनीय शास्त्रात बांधून ठेवण्याचा प्रयत्न केला त्या कला विलय पावल्या आणि ज्या भाषेने अशी शास्त्रे निर्माण केली त्या भाषा मृतप्राय झाल्या. संस्कृत हे त्याचे बोलके उदाहरण आहे. साहित्यिक कलावंताच्या प्रतिभेला



www.StudentBounty.com

StudentBounty.com



and writer for the rest of your life. One needs no school, no study room, no expenses and not many tuitions and coachings of any sort. If you are willing, you can accomplish this undertaking with ease whether you are poor, pressed with business or other conveniences and have many other sorts of problems.

43. Why is the knowledge of grammar essential ?

(A) It is essential for an image in the society

(B) It is necessary for judging the mind of others

(C) It is essential for good speaking and writing

(D) None of the above

जसे स्थल-कालाचे, संस्कृती-परंपरेचे, समाज-राजकारणाचे संदर्भ असतात आणि त्यासह ती विकसित होत असते. समीक्षाशास्त्र किंवा सौंदर्यशास्त्र कलानिर्मितीपूर्वी अस्तित्वात नसते. त्याचा उगम आणि विकास परजीवी असतो. साहित्य आणि कलांच्या अनुषंगाने त्याचा सतत विकास होत असतो. विकसित कलानिर्मितीप्रमाणे त्याला स्वत:ला विकसित व्हावे लागते किंवा निर्जीव निरर्थक बनावे लागते. मूळात कलेलाच जीवनाचे अनेक संदर्भ असल्यामुळे तिच्या स्वायत्ततेचा विचारच संशयास्पद आहे.

43. वाङ्‌मयाचे वर्गीकरण ही साहित्याच्या अभ्यासातील एक सोय असली, तरी कोणतेही वर्गीकरण कलात्मक अभिव्यक्तीचेच एक रूप असते :

(A) पूर्वार्ध चूक

(B) उत्तरार्ध चूक

(C) संपूर्ण विधान बरोबर

(D) संपूर्ण विधान चूक



www.StudentBounty.com

StudentBounty.com



44. How should grammar be learnt ?
    (A) It must be learnt as a whole
    (B) Some of its parts may be omitted like arithmetic
    (C) It is not essential, you can ignore anything
    (D) None of the above

45. The study of grammar demands :
    (A) constant body exertion
    (B) only the leisure time
    (C) physical hardship
    (D) heavy expenses for tuitions

46. A suitable title for the passage is :
    (A) The importance of Grammar in Life
    (B) The importance of Grammar in Writing
    (C) The importance of Grammar
    (D) None of the above

44. समाजातील प्रत्येक व्यक्ती अनन्यसाधारण असते, कारण :
    (A) जीवनदृष्टीतील विविधता
    (B) अर्जितगुणांची समानता
    (C) संचिताची विशालता
    (D) वरीलपैकी एकही नाही

45. साहित्याच्या निर्मितीत लेखकाच्या जीवनानुभूतीला जितके महत्त्व असते, तितके कालखंडातील अनुभवाला महत्त्व **नसते** :
    (A) उत्तरार्ध बरोबर
    (B) पूर्वार्ध बरोबर
    (C) संपूर्ण विधान बरोबर
    (D) संपूर्ण विधान चूक

46. साहित्यात कालखंडानुसार, राष्ट्रानुसार, प्रदेशानुसार भेद असले, तरी त्याचे साहित्यमूल्य कमी होत **नाही** :
    (A) पूर्वार्ध चूक
    (B) उत्तरार्ध चूक
    (C) संपूर्ण विधान बरोबर
    (D) संपूर्ण विधान चूक



www.StudentBounty.com

StudentBounty.com



47. Acquisition of the knowledge of grammar :
    - (A) happens by subconscious learning
    - (B) can only be done through tuitions
    - (C) is an easy task
    - (D) is not an easy task

48. The most important factor affecting learning of grammar is :
    - (A) availability of time
    - (B) willingness to learn
    - (C) quality of coaching
    - (D) the monetary means

49. The effectiveness of communication is usually decided on the basis of :
    - (A) quality of feedback
    - (B) sender's intention and criteria
    - (C) economic use of medium
    - (D) simplicity of message

47. कला ही अपरिवर्तनीय असल्यामुळे, तिला अपरिवर्तनीय शास्त्रात बांधून ठेवता येत **नाही** :
    - (A) संपूर्ण विधान बरोबर
    - (B) संपूर्ण विधान चूक
    - (C) उत्तरार्ध चूक
    - (D) पूर्वार्ध चूक

48. समीक्षाशास्त्र हे कलाधिष्ठित नसल्याने, त्याची निर्मिती ही स्वतंत्रपणे होत असते :
    - (A) संपूर्ण विधान बरोबर
    - (B) संपूर्ण विधान चूक
    - (C) पूर्वार्ध बरोबर
    - (D) उत्तरार्ध बरोबर

49. संज्ञापनाची परिणामकारकता सर्वसाधारणपणे कशाच्या आधारे ठरविली जाते ?
    - (A) प्रतिसादाचा दर्जा
    - (B) प्रेषकाचे हेतू आणि निकष
    - (C) माध्यमाचा सुयोग्य वापर
    - (D) संदेशाचा सोपेपणा



www.StudentBounty.com

StudentBounty.com



50. Which of the following is an *incorrect* pair ?

(A) Television : TRP

(B) Newspaper : RAM

(C) Website : Hits

(D) Film : Box office

51. In which of the following types of communication is feedback comparatively slow, weak and indirect ?

(A) Inter-personal communication

(B) Group communication

(C) Mass communication

(D) Non-verbal communication

52. Choose the correct match(es) :

(*i*) Psychological barriers—Symbol

(*ii*) Cultural barriers—Selective listening

(*iii*) Technological barriers—Voice disruption

(A) (*i*), (*ii*) and (*iii*)

(B) (*i*) and (*ii*)

(C) (*iii*)

(D) (*ii*) and (*iii*)

50. पुढीलपैकी कोणती जोडी चुकीची आहे ?

(A) दूरचित्रवाणी : टी. आर. पी.

(B) वृत्तपत्र : रॅम

(C) वेबसाईट : हिट्स्

(D) चित्रपट : बॉक्स ऑफिस

51. पुढीलपैकी कोणत्या संज्ञापनप्रकारात प्रतिसाद/प्रत्याभरण तुलनेने संथ, कमकुवत आणि अप्रत्यक्ष पद्धतीने येतो ?

(A) दोन व्यक्तींमधील संवाद

(B) गट संज्ञापन

(C) जन संज्ञापन

(D) नि:शब्द संज्ञापन

52. पुढीलपैकी योग्य जोडी/जोड्या निवडा :

(*i*) मानसिक अडथळा—प्रतीक

(*ii*) सांस्कृतिक अडथळा—निवडक श्रवण

(*iii*) तांत्रिक अडथळा—आवाजातील अडथळा

(A) (*i*), (*ii*) आणि (*iii*)

(B) (*i*) आणि (*ii*)

(C) (*iii*)

(D) (*ii*) आणि (*iii*)



www.StudentBounty.com

StudentBounty.com



53. When a teacher uses a video clip or sound clip or PowerPoint presentation in classroom teaching, the communication can be best described as :

(A) Mass communication

(B) Technological communication

(C) Visual communication

(D) Mediated group communication

54. Communication is classified into "intra-personal", "inter-personal", "group" and "mass" communication on the basis of :

(A) medium used for communication

(B) form of message exchanged between participants

(C) number of participants in communication

(D) social context of communication

53. जेव्हा शिक्षक वर्गामध्ये दृक्-श्राव्य, ध्वनीफीत किंवा पॉवरपॉईंट सादरीकरण वापरतात तेव्हा त्या संज्ञापनाचे सर्वाधिक यथार्थ वर्णन पुढीलपैकी कशाने करता येईल ?

(A) जनसंज्ञापन

(B) तंत्रज्ञानात्मक संज्ञापन

(C) दृक् संज्ञापन

(D) माध्यमबद्ध गटसंज्ञापन

54. "स्वसंवाद", "संवाद", "गटसंज्ञापन" आणि "जनसंज्ञापन" हे संज्ञापनाचे प्रकार कोणत्या निकषांवर बेतलेले आहेत ?

(A) संज्ञापनासाठी वापरलेले माध्यम

(B) सहभागी घटकांमधील संदेशाचे स्वरूप

(C) संज्ञापनामध्ये सहभागी झालेल्या व्यक्तींची संख्या

(D) संज्ञापनाचा सामाजिक संदर्भ



www.StudentBounty.com

StudentBounty.com



55. Fill in the blank by an appropriate number in the following series :

5, 35, 7, 42, 6, ..........., 9, 36, 4.

(A) 45

(B) 48

(C) 54

(D) 56

56. Which of the following numbers is different from the others ?

(A) 3156

(B) 4164

(C) 5255

(D) 6366

57. Find an appropriate letter combination in place of the question mark (?) :

KP MN OL QJ SH ?

(A) UF

(B) UG

(C) TF

(D) VG

55. पुढील क्रमिकेत रिकाम्या जागी योग्य संख्या निवडा :

5, 35, 7, 42, 6, ..........., 9, 36, 4.

(A) 45

(B) 48

(C) 54

(D) 56

56. पुढील संख्यांपैकी इतरांपेक्षा वेगळी संख्या कोणती आहे ?

(A) 3156

(B) 4164

(C) 5255

(D) 6366

57. पुढील क्रमिकेत प्रश्नचिन्हाच्या ( ? ) जागी योग्य पर्याय दिलेल्या अक्षरसमूहातून निवडा :

KP MN OL QJ SH ?

(A) UF

(B) UG

(C) TF

(D) VG



www.StudentBounty.com

StudentBounty.com



58. In a certain code language using code symbols for mathematical operations, 18 + 3 = 6; 9 – 2 = 18; 11 × 11 = 22 and 18 ÷ 3 = 15. Evaluate the following operation in this code language :

8 × 4 – 12 + 3 ÷ 2 = ?

(A) 7

(B) 12

(C) 14

(D) 22

59. X, Y and Z are non-zero numbers. If X = 2Y and Y ≠ Z, then which of the following statements can be valid ?

(A) X = Y + Z

(B) X – Y = Z

(C) X < Z

(D) All the above statements can be valid

60. Which of the following numbers is different from the others ?

49, 81, 100, 144

(A) 49

(B) 81

(C) 100

(D) 144

58. एका सांकेतिक भाषेत गणितीय क्रियांसाठी वेगळी संकेतचिन्हे वापरतात. यानुसार 18 + 3 = 6; 9 – 2 = 18; 11 × 11 = 22 आणि 18 ÷ 3 = 15. या भाषेनुसार पुढील क्रियेचे मूल्यमापन करा :

8 × 4 – 12 + 3 ÷ 2 = ?

(A) 7

(B) 12

(C) 14

(D) 22

59. X, Y व Z या संख्या शून्याहून वेगळ्या आहेत. जर X = 2Y आणि Y ≠ Z असेल, तर पुढीलपैकी कोणते/ती विधान/ने खरे/री असू शकेल/शकतील ?

(A) X = Y + Z

(B) X – Y = Z

(C) X < Z

(D) वरील सर्व विधाने खरी असू शकतील

60. पुढीलपैकी कोणती संख्या इतरांपेक्षा वेगळी आहे ?

49, 81, 100, 144

(A) 49

(B) 81

(C) 100

(D) 144



www.StudentBounty.com

ROUGH WORK



www.StudentBounty.com

StudentBounty.com

**ROUGH WORK**



www.StudentBounty.com

StudentBounty.com



ROUGH WORK



www.StudentBounty.com

StudentBounty.com



**ROUGH WORK**



www.StudentBounty.com